# ऑनलाईन प्रमाणपत्र शिक्षणक्रम
# तथागत भगवान बुद्ध आणि त्यांचे तत्त्वज्ञान
# (The Buddha and his Philosophy)

## माहितीपत्रक




**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**



**आजीवन अध्ययन व  विस्तार विभाग**

**Department of Lifelong Learning and Extension (DLLE)**

**आणि**

**बौद्ध अध्यासन आणि संशोधन केंद्र,विचारधारा प्रशाळा**

तथागत बुद्ध संपूर्ण जगाला अहिंसा, करुणा आणि शांतीचा संदेश देण्यासाठी ओळखले जातात. त्यांची शिकवण जगातील असंख्य लोकांचे जीवन जगण्याचा मार्ग आहे. तथागत बुद्ध यांनी असे म्हटले आहे की, हे जग स्थिर होण्याऐवजी अस्थिर आहे, म्हणून या जगातील प्रत्येक गोष्ट सतत बदलत असते, म्हणजेच ती शाश्वत असते.

भगवान गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान वैश्विक आहे. बुद्ध तत्त्वज्ञानाच्या चिंतनाचे केंद्र 'माणूस' आहे. 'प्रतित्यसमुत्पाद' हा बौद्ध तत्त्वज्ञानाचा पाया आहे. मानवी जीवन हे दु:खमय आहे. त्यांनी दु:खाची कारणे व त्यावरील उपाय सांगितले. जीवन दुःखी आहे, त्याचे कारण म्हणजे तृष्णा (लोभ,(आसक्ती), द्वेष,मोह) आदी होय.

निसर्गामध्ये घडणाऱ्या घटनांचे शास्त्रीय विश्लेषण करणारे जगातील पहिले शास्त्रज्ञ म्हणजे बुद्ध होय. भगवान बुद्धांचे विचार, तत्त्वज्ञान आणि कार्य हे चमत्कारावर नव्हे, तर ज्ञानावर आधारलेले आहे. आपल्याला प्राप्त झालेले ज्ञान लोकांना सांगावे, दुःखापासून मुक्ती मिळवण्याचा मार्ग त्यांनी जगाला शिकवला. गौतम बुद्धांनी लोकांना 'मध्यम मार्ग' शिकवला. संसारात पुरते बुडून जाणे हे एक टोक आणि जंगलात जावून तपश्चर्या करणे हे दुसरे टोक. ही दोन्ही टोके टाळून 'चार आर्यसत्य' आकलन केलेल्या अष्टांग मार्गाने चालणे म्हणजे 'मध्यम मार्ग' होय.

नीती आणि सदाचाराला महत्व देऊन मानवाचे जीवन सुखकर होण्यासाठी  तसेच निर्वाणाच्या समीप पोहोचण्यासाठी तथागत बुद्ध यांनी सम्यक दृष्टी,सम्यक संकल्प, सम्यक वाणी,सम्यक कर्मांत,सम्यक आजीविका,सम्यक व्यायाम,सम्यक स्मृति आणि सम्यक समाधि हे आर्य अष्टांगिक मार्ग सांगितले आहेत.

भगवान बुद्धांनी सांगितलेली वचने, तत्त्वज्ञान जीवनात भरकटलेल्या माणसाला योग्य मार्ग दाखवतात. माणसाला मार्गदर्शन करताना गौतम बुद्ध म्हणतात, की जीवनातलं कोणतंही उद्दिष्ट किंवा ध्येय गाठण्यापेक्षा तो प्रवास चांगल्या प्रकारे पूर्ण करणं महत्त्वाचं आहे. जीवनात दु:ख आहे ह्या सत्याचा स्वीकार करणे गरजेचे आहे. दु:ख आहे हे मान्य केले नाही तर हे दु:ख कमी होणारं नाही  पण मान्य केले तर ते नष्ट करण्याचा मार्ग शोधता येतो असे अत्यंत मौलिक तत्त्वज्ञान तथागत बुद्धांनी सांगितले आहे.

**बौद्ध तत्त्वज्ञान**



# शिक्षणक्रमाचा उद्देश

- भगवान बुद्धांचा  जीवन परिचय करून देणे.
- बौद्ध तत्त्वज्ञानातील विविध संकल्पना स्पष्ट करू सांगणे.
- 'बोधीसत्त्व ते सम्यक संबुद्ध' या जीवन प्रवासाची ओळख करून देणे.
- बुद्ध तत्वज्ञानाच्या विज्ञानवादी आणि मानवतावादी ज्ञानाचा प्रसार करणे.
- विविध महाविद्यालयात शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी, शिक्षक,पालक आणि समाजातील सर्व स्तरातील तळागाळापर्यंतच्या घटकांपर्यंत भगवान बुद्धांच्या तत्त्वज्ञानाची महती पोहोचवणे.

# वैशिष्ट्ये

- घरी बसून ऑनलाईन पद्धतीने बौद्ध तत्त्वज्ञानाचा परिचय होईल
- फक्त  तीस (30) तासांचा आणि किमान एक महिन्यात शिक्षणक्रम पूर्ण करू शकाल
- तज्ज्ञ आणि अनुभवी प्राध्यापकांचे रेकॉर्ड केलेल्या व्हिडीओद्वारे मार्गदर्शन
- शिक्षणक्रमअंतर्गत कार्य यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यापीठाकडून अधिकृत प्रमाणपत्र मिळणार



# शिक्षणक्रम स्वरूप

| | |
|---|---|
| **लक्ष्य गट (Target Group** | 18 वर्षांपुढील कोणीही प्रवेशास पात्र |
| **प्रवेश क्षमता (Intake Capacity)** | 50 पर्यंत |
| **प्रवेश पात्रता (Eligibility Criteria)** | किमान 12 वी पास |
| **श्रेयांक(Credit)** | 2(दोन) |
| **एकूण तास (Total Hours)** | 30 तास (किमान एक महिना कालावधी) |
| **व्याख्याने स्वरूप (Lecture Pattern** | 'बा तथागता' या विशालकाव्यावर आधारित तज्ज्ञ आणि अनुभवी प्राध्यापक यांचे रेकॉर्ड केलेल्या व्हिडीओंद्वारे मार्गदर्शन |
| **शुल्क (Fees)** | 500/- |
| **प्रात्यक्षिक कार्य (Practicle Work)** | बौद्ध स्थळांना भेटी आणि अहवाल लेखन |
| **स्वाध्याय लेखन (Assignment Writing)** | स्वाध्याय लेखनासाठी प्रश्न दिले जातील. |
| **परीक्षा गुण (Total marks for Exam)** | 50 |
| **परीक्षा स्वरूप (Exam Pattern)** | स्वाध्याय आणि प्रात्यक्षिक कार्य (25 गुण+25 गुण) |



## ऑनलाईन प्रवेश लिंक आणि अधिक माहितीसाठी संपर्क


**पत्ता:-** बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग,
डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यार्थी भवन,पहिला मजला,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (महाराष्ट्र)
पिनकोड -425001

**संकेत पृष्ठ (Web-page ):**
https://nmu.ac.in/external-education/en-us/Programmes/Certificate-Program

**ई-मेल (E-mail):** ideal@nmu.ac.in

**फेसबुक (Facebook ID):** DEEL,Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon.

**संपर्क (Contact):** 0257-2257495/2258496



डॉ.मनिषा व्ही.जगताप
सहा.प्राध्यापक आणि
शिक्षणक्रम समन्वयक,आजीवन विभाग

प्रा.डॉ.आशुतोष आर.पाटील
संचालक,
आजीवन विभाग


## शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी हार्दिक शुभेच्छा

